# बोरगांव मंजू येथे ग्रामस्थांना दिले सायबर सुरक्षेचे धडे

बोरगांव मंजू ,दि १९ (प्रतिनिधी):

ग्रामपंचायत कार्यालय,बोरगाव मंजू येथे सायबर सुरक्षा जनजागृती अभियाना अंतर्गत सायबर गुन्हे कमी करण्याच्या दृष्टीने कोणती काळजी घ्यावी याविषयी गावकर्यांसाठी मार्गदर्शन करण्यात आले.हा कार्यक्रम शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला यांनी क्विक हील फाउंडेशन पुणे, महाराष्ट्र सायबर मुंबई यांच्या सहयोगाने आणि सरपंच श्रीमती अनिता खेडकर आणि उपसरपंच श्रीमती बेबीनंदा गवई यांच्या परवानगीने आयोजित केला होता.



यावेळी अभियानाचे सम न्वयक डॉ. हरिदास खरात, सायबर वॉरियर्स साक्षी शिरसाठ,वैष्णवी पाटील, सानिका वाघमारे, प्रणाली दवणे यांनी ग्रामस्थांना एम. एस. इ. बी. बिल न भरल्याचे खोटे मेसेजेस, ई के. वाय. सी. विषयी येणारे कॉल, कर्ज मंजूर झाले आहे पैसे भरा, लॉटरी, नोकरी, ए. टी.एम., फोटोमोर्फिंग करून ब्लॅकमेल करणे, ए. टी. एम. आणि व्हॉईस क्लोनिंग, या विषयी विविध पद्धतीने कशी ऑनलाईन फसवणूक होते, यापासून आपण कसे सुरक्षित राहावे याविषयी सविस्तर माहिती सांगितली आणि सुरक्षित राहण्याचे आव्हान केले.

सुरक्षा टिप्स असलेले माहिती पत्रकाचे यावेळी वाटप करण्यात आले आणि आम्ही मोबाइलचा योग्य वापर करू अशी शपथ दिली.

यावेळी श्री सुनील खेडकर, श्री.विकास देशमुख, श्री अभय इंगळे, श्री मुनीर अहमद, श्रीमती शीतल गुंजाळ,श्री शाम गवळी,श्री विनोद बसू,श्री नेमाडे सर, साहिल आणि इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मा
संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,१९२२